माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/E/०००७२**

**अपिलार्थी श्री. पंचप्पा काळे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंग मार्ग,
कुलाबा, मुंबई -४०० ००१.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
पोलीस मुख्यालय, शहिद भगतसिंग मार्ग,
कुलाबा, मुंबई -४०० ००१

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०७.२०२५</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रकिंग रिपोर्ट नुसार दि. १८.०६.२०२५ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २८.१०.२०२३ | | २९.११.२०२३ | |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २०.०३.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती दिलेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी दि. २८.१०.२०२३ रोजी पोलीस आयुक्त, मुंबई कार्यालयाकडे माहिती अर्जानुसार पोलीस महासंचालक यांचेकडे दि. १७.१०.२०२३ रोजी केलेली तक्रारीवर करण्यात आलेली कार्यवाही विषयी माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त, मुंबई यांनी सदर माहिती अर्ज पोलीस आयुक्त, सोलापूर यांच्याकडे ऑनलाईन हस्तांतरीत केला. अपिलार्थी यांनी दि. २८.११.२०२३ रोजी पोलीस आयुक्त, मुंबई यांच्या कार्यालयाकडे प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी सुनावणी नोटीस प्राप्त असूनही अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, पोलीस महासंचालक कार्यालय उपस्थित असून त्यांनी त्यांचे लेखी सादर करुन नमुद केले की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाकडून पोलीस आयुक्त, सोलापूर यांना ऑनलाईन पाठविण्यात आल्याचे दिसून येते. तसेच, जन माहिती अधिकारी, पोलीस आयुक्त, सोलापूर यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे.

..२/-

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ०२.०७.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास 2-7-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**